# फळसेवाडी हितकारी संस्था
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : शनिवार २३ जून २०१८
**स्थळ** : १४ कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – ४०० ०५३.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| १. श्री मंगेश मनोहर राणे | ८. श्री गंगाराम महादेव राणे (आमंत्रित) |
| २. श्री सुनिल सदानंद राणे | ९. श्री गुरुनाथ गणपत राणे (आमंत्रित) |
| ३. श्री उदय भगवान राणे | |
| ४. श्री दशरथ दत्ताराम साटम | |
| ५. श्री अशोक दत्ताराम राणे | |
| ६. श्री हेमंतकुमार रमेश राणे | |
| ७. श्री रंजन रावजी म्हसकर | |

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारिणीची सभा संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचे शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल येथील निवासस्थानी घेण्यात आली. सभेस कार्यकारीणीतील ७ सदस्य तसेच आमंत्रितांपैकी २ ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री सुनिल सदानंद राणे, सचिव यांनी प्रथम उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करताना सचिवांनी विषयपटलावरील विषय उपस्थितांस वाचून दाखविले.

**विषय क्रमांक १**
सचिवांनी श्री हेमंतकुमार रमेश राणे यांस दिनांक १५ एप्रिल २०१८ रोजी घेण्यात आलेल्या कार्यकारीणी सभेचे इतिवृत्त उपस्थितांना वाचून दाखविण्याची सूचना केली. श्री हेमंतकुमार रमेश राणे यांनी इतिवृत्ताचे वाचन केल्यानंतर उपस्थिताकडून इतिवृत्तामध्ये कोणत्याही सुचना / सुधारणा / बदल सुचविण्यात न आल्यामुळे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

**विषय क्रमांक २**
सचिवांनी श्री दशरथ दत्ताराम साटम यांस मागील कार्यकारीणी सभेनंतर संस्था करत असलेल्या कामांच्या प्रगतीसंबधी उपस्थितांस माहीती देण्याची सूचना केली. यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी उपस्थितांस खालील माहीती दिली –

- **पथदिवे** – पथदिवे सार्वजनिक विद्युतव्यवस्थेवर जोडण्यासाठी करावयाच्या कामाबाबत काही प्रगती झालेली नाही. श्री साबाजी विठोबा साटम यांच्या घराजवळील एक पथदिवा बंद झाल्याचे निर्दशनास आणले असता पथदिवे वॉरंटीमध्ये असल्यामुळे तो बदलून घ्यावा या विचाराने स्थानिकांच्या मदतीने तो काढला असता असे निर्दशनास आले कि पथदिवा बिघडला नसून फक्त वायर निघाल्यामुळे तो बंद होता. पोलवरून काढलेला पथदिवा मी माझ्या घरी ठेवला आहे. पथदिवे सार्वजनिक विद्युतव्यवस्थेवर जोडण्यासाठी

आवश्यक असलेल्या आर्मडवायरचा पूरवठा मुंबईहून करता येईल परंतु जोडणी करण्यासठी  कोणीतरी स्थानिक व्यक्तींने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

- **<u>सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्था</u>** – सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्थेचे पहिल्या टप्याअंर्तगतचे काम म्हणजेच पाण्याच्या टाकीचे स्ट्रक्चर उभारण्याचे काम जवळपास मार्गी लागले असून श्री संकेत रत्नाकर राणे यांनी पुढाकार घेऊन ही जबाबदारी उचलली आहे, श्री दिलीप मधूकर मालवणकर, श्री लिंगेश्वर देवालय जिर्णोध्दारासाठी नेमलेले कंत्राटदार यांस काम देण्याचे ठरविण्यात आलेले असून या कामावर श्री संकेत रत्नाकर राणे आणि सौ अनुजा अरुण राणे यांनी देखरेख करण्याची जबाबदारी घेतली आहे.  याविषयाबाबत विषय क्रमांक ७ अर्तंगत सविस्तर चर्चा करण्यात येईल.

- **<u>वाडीवर येणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती तसेच टेंबावर जाणाऱ्या नवीन नोंदणी झालेल्या रस्त्याचे खडीकरण / डांबरीकरण</u>** – यासंर्दभात दिनांक १८ मार्च २०१८ रोजी श्री लिंगेश्वर देवळाच्या जिर्णोध्दार संबधी गावी घेण्यात आलेल्या सभेनंतर पिसेकामते गावचे सरपंच श्री सुहास राणे यांनी हे काम मार्च २०१८ पर्यत काम करून देण्याचे आश्वासन दिले होते. यापैकी शाळेकडून वाडीवर येणाऱ्या रस्त्याची (जवळपास ८० मीटर) दुरुस्ती करण्यात आलेली आहे. रस्तेदुरुस्तीकरता फंड मंजूर होऊ न शकल्याने सरपंचानी दिलेल्या शब्दाखातर ही दुरुस्ती एडव्हान्स कंत्राट देऊन श्री राजू इकाळे या कंत्राटदाराकडून करून घेतली असल्याची माहीती मिळाली आहे. यासाठी स्थानिक ग्रामस्थ श्री अंकूश मारुती राणे यांनी स्वत:हून प्रयत्न केले आहेत. तसेच सरपंच व श्री अंकूश मारुती राणे यांनी वाडीवर येणाऱ्या उर्वरीत रस्त्याचे दुरुस्तीकरण तसेच टेंबावर जाण्यासाठी करण्यात आलेल्या नवीन रस्त्याचे खडीकरण / डांबरीकरण करण्याचे काम दिवाळीनंतर हाती घेण्यात येईल असा शब्द दिलेला आहे.

- श्री अंकूश मारूती राणे यांनी आमदारांकडून विहीरीसाठी फंड मंजूर करुन घेऊ का ? अशी विचारणा केली असता त्यांस सांगितले आहे की विहीरीसाठी योजलेल्या जागेच्या मालकीसंबधी अजूनही स्पष्टता नसल्यामुळे आपणांस प्रथम जागा मालकी कोणाची आहे याबाबत निश्चिती माहिती मिळवावी लागेल त्यानंतर जागा मालकास जागा मोजणी करून घ्यावयाची सूचना करुन जागा मालकी निश्चिती झाल्यानंतरच जागा मालकाकडून बक्षिसपत्र मिळवून त्यानंतर फंडाच्या उभारणीबाबत प्रयत्न सुरू करावा लागेल.

- श्री मेघश्याम नारायण राणे यांनी एका ट्रस्ट मार्फत पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मिळवून देतो परंतू त्यासाठी त्यास प्रकल्प अहवाल द्यावा लागेल अशी माहीती दिली असता त्यांनी सांगितलेल्या श्री रवि देशपांडे, कॉसमॉस बँक (मोबाईल क्र. ७४४७७ २६२०९, इमेल **dravi286@gmail.com ; rl.deshpande@cosmosbank.in**) यांस प्रकल्प अहवाल बनवून पाठविला आहे. प्रकल्प अहवालाची प्रत श्री मेघश्याम नारायण राणे यांस पोष्टाने पाठविली असून याबाबत त्यांस पाठपुरावा करण्याची सूचना करण्यात आली आहे.

- ब्राह्मण विहीरीच्या आसपास  असलेल्या आणि ग्रामपंचायतीच्या नावे असलेल्या जमीनीचे तीन तुकडे (भुमापन क्रमाक ५६१ (काजऱ्याचा नाळवा), भुमापन क्रमांक ११५२ (नाळवा) आणि भुमापन क्रमांक ६५६ (तीन आंबे)) यांची मोजणी करून घेण्याबाबत ग्रामपंचायत (ग्रामसेवक) व सरपंच यांच्याशी सतत पत्रव्यवहार करण्यात येत असून या प्रकरणाचा पाठपूरावा करण्याची जबाबदारी श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे यांचेवर

सोपविलेली आहे. मी स्वत: ग्रामसेवकास घेऊन भुलेखापरिक्षण कार्यालयात जाऊन चौकशी केली असता त्यांनी जागा मोजणी करून घेण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस असल्याचे सांगितले असून शिघ्र मोजणीसाठी प्रत्येक तुकड्यामागे रु.२०००/- इतका खर्च येईल अशी माहिती दिलेली आहे. ग्रामसेवकाने आवश्यक तो प्रस्ताव मांडण्याचे आश्वासन दिलेल आहे. शिघ्र मोजणीसाठी अर्ज केल्यास ऑगष्ट / सप्टेंबर २०१८ च्या दरम्याण मोजणी होऊ शकेल अशी माहीती भूलेखापरिक्षण कार्यालयाकडून मिळालेली आहे. मोजणी दरम्याण कदाचीत ब्राह्मण विहीर या तुकड्यामध्ये असल्याची आढळल्यास जागामालकीचा प्रश्न निकालत निघेल व बक्षिसपत्र मिळविण्याची गरज भासणार नाही तसेच ग्रामपंचायतीकडून ब्राह्मण विहीरीचे रुंदीकरण करून घेण्यासाठी प्रयत्न करता येतील. ब्राह्मण विहीर या तुकड्यात नसल्यास परंतू हे तुकडे ब्राह्मण विहीरी जवळपास असल्याचे आढळल्यास ब्राह्मण विहीरच्या भुमापण क्रमांकाचा अंदाज येऊन योग्य त्या जमिन मालकास मोजणी करुन घेण्याबाबत तसेच बक्षिसपत्राबाबत विचारणा करता येईल.

- रस्त्याच्या बांधकामासाठी पेव्हर ब्लॉक वापरण्यासंबधी श्री प्रविण मधुकर राणे यांचेकडून पुढे काही माहिती मिळू न शकल्यामुळे हा विषय त्यांचे उपस्थितीत पुन्हा चर्चेस घेण्यात येईल.

**<u>विषय क्रमांक ३</u>**

सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की २०१७ – १८ साली म्हणजेच ३१ मार्च २०१८ पर्यंत इच्छूक ९५ ग्रामस्थांपैकी ९३ ग्रामस्थांनी सभासदत्वाचे फार्म भरून दिलेले आहेत. दोन ग्रामस्थ म्हणजे श्री एकनाथ अनंत राणे आणि श्री संजय मनोहर राणे यांनी संस्थेची थकबाकी / वर्गणी दिलेली असून फक्त फार्म भरून मिळावयाचे बाकी आहेत. फार्म भरुन मिळाल्यापैकी ६८ ग्रामस्थ नविन झालेले सभासद आहेत. प्रथमत: सभासद होऊ इच्छिनाऱ्या या ६८ ग्रामस्थांकडून रु.१००/- (रुपये शंभर फक्त) अशी प्रवेश फी जमा झालेली आहे. तसेच दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी संस्थेच्या नोंदणीपुस्तकात नोंदणी असलेल्या सभासदांकडून फक्त सभासदत्वाचा नविन फार्म भरुन घेतलेला असून प्रवेश फी आकारण्यात आलेली नाही.

सचिवांनी प्रस्ताव मांडला की जुन्या तसेच नविन सभासद होऊ इच्छिनाऱ्या या सभासदांस / ग्रामस्थांस संस्थेच्या रेकार्डसाठी सभासद क्रमांक द्यावयाचा असून सभासद क्रमांक तीन भागामध्ये विभागण्याचे प्रयोजन आहे. पहिल्या भागात फळसेवाडी हितकारी संस्थेचे संक्षिप्त नाव "फहिसं", दुसऱ्या भागामध्ये अनुक्रमांक आणि तिसऱ्या भागामध्ये ग्रामस्थाच्या गावच्या घराचा ग्रामपंचायतीकडे नोंद असलेला क्रमांक या पध्दतीनुसार सभासद क्रमांक द्यावा असा विचार आहे.

उपस्थितांनी ३१ मार्च २०१८ पर्यंत फार्म भरलेल्या सर्व ग्रामस्थांस सभासद करून घ्यावे या प्रस्तावास मान्यता दिली तसेच सचिवांनी मांडलेल्या पध्दतीने सभासद क्रमांक देण्यास मंजूरी दर्शविली. त्यानंतर ३१ मार्च २०१८ पर्यंत फार्म भरुन दिलेल्या सर्व सभासदांस / ग्रामस्थास नविन सभासद क्रमांक देण्याची जबाबदारी सचिवांनी स्वत:वर घेतली.

**<u>विषय क्रमांक ४</u>**

सचिवांनी उपस्थितांस सांगितले की मागिल कार्यकारीणीच्या सभेमध्ये आपण सभासद नोंदणी अभियान ३० जून २०१८ पर्यंत पूर्णत्वास नेण्याचा संकल्प केला होता. आजपर्यत जमा करण्यात आलेले फार्म विचारात घेता संस्थेजवळ १४२ सभासदत्वाचे फार्म जमा झालेले आहेत म्हणजेच गेल्या ३ महिण्यात आपण ४३ ग्रामस्थांकडून फार्म मिळविण्यात यश मिळविले आहे.

सचिवांनी पुढे सांगितले जरी आपण सभासद नोंदणी अभियान पूर्णत्वास नेऊ शकलो नसलो तरी गेल्या ३ महिण्यात करण्यात आलेली प्रगती प्रशंसनीय आहे. तसेच महत्वाचे म्हणजे गेल्या ३ महीण्यात मिळालेल्या फार्मपैकी ८ फार्म स्थानिक ग्रामस्थांकडून भरुन मिळालेले असल्यामुळे संस्थेच्या सभासदनोंदणीच्या आवाहनास स्थानिक ग्रामस्थाकडूनही प्रतिसाद मिळत असल्याचे शुभचिन्ह आहे. तसेच दिनाकं ३१ मार्च २०१७ पर्यत येणे असलेल्या थकबाकीपैकी जवळपास ४३ सभासदांनी थकबाकीचा भराणा केलेला आहे.

सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की संस्थकडे असलेली ग्रामस्थांची माहिती विचारात घेता फळसेवाडीशी जवळपास ४६८ ग्रामस्थ संलग्न असून उपलब्ध जन्मतारखेनुसार जवळपास ३०१ ग्रामस्थ १८ वर्षावरील आहेत, जवळपास १२६ ग्रामस्थांच्या जन्मतारखेची नोंद संस्थेकडे नसल्यामुळे त्याच्या वयाचा अंदाज नाही. संस्थेने आतापर्यंत १४२ ग्रामस्थांकडून सभासदत्वाचे फार्म भरून घेण्यात यश मिळविले असल्यामुळे ३०१ ग्रामस्थांपैकी जवळपास ५०% ग्रामस्थास सभासद करुन घेण्याचे उध्दिष्ट साध्य करण्यात संस्थेने यश मिळविलेले आहे. त्यानंतर सचिवानी उपस्थितांस संस्थेचे सभासद नोंदणी अभियान शक्यतीतक्या लवकर पूर्णत्वास न्यावे अशी सूचना केली.

**<u>विषय क्रमांक ५</u>**

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी माहिती दिली की पिसेकामते विकास मंडळाने श्री लिंगेश्वर मंदिराच्या जिर्णोध्दाराच्या कामाचा पहिला आणि महत्वाचा टप्पा म्हणजेच कंत्राटदाराची नेमणूक हा पार केलेला आहे. मे गायत्री कन्स्ट्रक्शन या फर्मला मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम देण्यात आलेले असून या फर्मची निवड एकूण ५ कंत्राटदारांमधून करण्यात आलेली आहे. मे गायत्री कन्स्ट्रक्शनचे प्रोपरायटर श्री दिलीप मालवणकर हे असून ते स्वत: सिव्हिल इंजिनीअर (डिप्लोमा होल्डर) आहेत. दिनांक १८ मे २०१८ रोजी पिसेकामते विकास मंडळ व कंत्राटदार यांच्यात करारपत्र करण्यात आलेले असून कंत्राटदारास मंदिराच्या बांधकामासाठी एकूण रु.३५,६१,०००/- (रुपये पस्तीस लाख एकसष्ट हजार रुपये फक्त) खर्च देण्यात येणार आहे. या खर्चामध्ये लाकूडकामासाठी होणाऱ्या खर्चाचा सामावेश करण्यात आलेला नाही.

पिसेकामते विकास मंडळाकडे दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत विविध तीन योजनांच्या माध्यमातून जवळपास तीस लाख रुपये जमा झालेले असून उरलेल्या पैशाची लवकरच तरतूद होईल अशी खात्री आहे. उर्वरीत रक्कम जमविण्यासाठी पिसेकामते विकास मंडळाने नविन चवथी योजना आखलेली असून या योजने अर्तंगत पिसेकामते गावाशी संलग्न ग्रामस्थांस मंदिराचे खांब किंवा पायऱ्या पुरस्कृत करण्याची संधी देण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी पुरस्कृत केलेल्या खाबांवर किंवा पायऱ्यांवर पुरस्कर्ता त्याच्या इच्छेनुसार दोन नावे प्रर्दशित करण्याची विनंती करू शकणार असून या योजनेमध्ये सामील होणाऱ्या ग्रामस्थांस त्याचे पूर्वजांचे किंवा त्यांचे स्वत:चे नाव देवळाच्या वास्तून प्रर्दशित करण्याची संधी मिळणार आहे.

पिसेकामते गावामध्ये ७ वाड्या असून काही वाड्यांमध्ये कार्यरत असलेल्या संस्थांतर्फे वाड्यांतर्फे लिंगेश्वराच्या मंदिराचे खांब पुरस्कृत करण्यासाठी हालचाली सुरु आहेत. आपणही फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे किंवा फळसेवाडी तर्फे एखादा खांब किंवा पायरी पुरस्कृत करण्यासाठी प्रयत्न करावयास हवा जेणेकरून फळसेवाडीचे नाव मंदिराच्या सभामंडपात प्रदर्शित होऊन सर्वांच्या नजरेत येईल.

पिसेकामते विकास मंडळातर्फे मंडळामध्ये नोंदणी झालेल्या सभासदांस या योजनेची माहीती पत्राव्दारे देण्यात आलेली आहे. त्यामुळे वाडीतील जे ग्रामस्थ पिसेकामते विकास मंडळाचे सभासद आहेत त्यांस पिसेकामते विकास मंडळातर्फे पत्र मिळालेले आहेच. परंतू फळसेवाडीतील जे ग्रामस्थ पिसेकामते विकास मंडळाचे सभासद नाहीत त्यांच्या माहीतीसाठी फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे पत्र पाठविण्याचे प्रयोजन आहे जेणेकरून आपल्या ग्रामदेवतेच्या गाभाऱ्याबाहेर / सभामंडपात फळसेवाडी मधील जास्तीत जास्त ग्रामस्थांची नावे प्रदर्शित होतील आणि पुढील कित्येक दशके ही नावे श्री लिंगेश्वर मंदिरात दर्शनास येणाऱ्या भाविकांच्या समोर राहतील. या नविन योजनेअर्तंगत फार्म दिनांक १५ सप्टेंबर २०१८ पर्यंत भरून पिसेकामते विकास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडे द्यावयाचे आहेत.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की मंदिराचे बांधकाम दसऱ्याच्या दरम्याण सुरू करण्यात येणार असून त्यापूर्वी देवालय समितीकडून देवाचा कौल घेणे इत्यादी आवश्यक कामे पूर्ण करण्यात येतील.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी दिलेल्या या माहितीवर उपस्थितांनी समाधान व्यक्त केले आणि फळेसवाडीतील सर्व ग्रामस्थांस पत्राव्दारे या नविन योजनेची माहीती देण्याची सूचना केली. उपस्थितांनी फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे मंदिराचा खांब किंवा पायरी पुरस्कृत करावयाच्या विचारास मान्यता दिली. उपस्थितांतर्फे सूचना करण्यात आली की फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे पुरस्कृत करण्यात येणाऱ्या खांब किंवा पायरीसाठी आवश्यक असलेल्या फंडाच्या उभारणीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत चर्चा करण्यात यावी.

**<u>विषय क्रमांक ६</u>**

पिसेकामत विकास मंडळातर्फे देण्यात आलेल्या पावतीपुस्तकांबाबत चर्चा करण्यात आली असता श्री गुरुनाथ गणपत राणे आणि श्री भरत गणपत राणे यांनी त्यांना दिलेली पावती पुस्तके संपवून जमा झालेल्या रक्कमेसहीत परत केली. तसेच श्री गंगाराम महादेव राणे यांस नविन पावतीपुस्तक देण्यात आले. वितरीत झालेल्या आणि परत भराणा झालेल्या पावतीपुस्तकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| **क्र** | **नाव** | **पुस्तक क्र** | **पावती क्र** | | **जमा रक्कम** | **तारीख** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री उदय भगवान राणे | १६१ | ४००१ | ४०२५ | | |
| २ | श्री अशोक दत्ताराम राणे | १७१ | ४२५१ | ४२७५ | | |
| ३ | श्री मंगेश मनोहर राणे | १७२ | ४२७६ | ४३०० | | |
| ४ | श्री हेमंतकुमार रमेश राणे | १७४ | ४३२६ | ४३५० | | |
| ५ | श्री सुनिल सदानंद राणे | १७५ | ४३५१ | ४३७५ | | |
| ६ | श्री उत्तम वामन राणे | १७६ | ४३७६ | ४४०० | | |
| ७ | श्री भरत गणपत राणे | १७७ | ४४०१ | ४४२५ | २५१८.०० | २३-०६-२०१८ |
| ८ | श्री गुरुनाथ गणपत राणे | १७८ | ४४२६ | ४४५० | २५००.०० | २३-०६-२०१८ |
| ९ | श्री गुरुनाथ गणपत राणे | १७९ | ४४५१ | ४४७५ | २७००.०० | २३-०६-२०१८ |
| १० | श्री भास्कर दौलत राणे | १८० | ४४७६ | ४५०० | | |
| ११ | श्री गंगाराम महादेव राणे | १६४ | ४०७६ | ४१०० | | |
| | **एकूण जमा** | | | | **७७१८.००** | |

सचिवांनी उपस्थितांस सूचना केली आली की मंदिराचे काम लवकरच सुरू होणार असल्यामुळे कार्यकारीणी सदस्यांनी त्यांचेकडे असलेली पावती पुस्तके संपवून संस्थकडे सुपूर्द करावीत जेणेकरून मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी होणाऱ्या खर्चाची संपूर्ण तरतूद मंदिराचे बांधकाम सुरू करण्यापूर्वीच होईल.

**<u>विषय क्रमांक ७</u>**

संस्थेतर्फे योजिलेल्या स्वयं:पूर्ण पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीची माहीती देताना श्री दशरथ साटम यांनी सांगितले की पाण्याच्या टाकीच्या स्ट्रक्चरचे बांधकाम करुन घेण्याची जबाबदारी स्थानिक कार्यकारीणी सदस्य श्री संकेत रत्नाकर राणे यांनी आपल्या शिरावर घेऊन त्या दृष्टीने कामगारांची व सामानाची जुळवाजुळव सुरू केली होती. या दरम्याण श्री दिलीप मालवणकर ज्या कंत्राटदारास श्री लिंगेश्वर मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम देण्यात आले त्यांस आमचे हे काम करून द्याल का ? अशी विचारणा केली असता त्यांनी हे काम करून देण्याची तयारी दर्शविल्यामुळे श्री संकेत रत्नाकर राणे यांच्या तर्फे श्री दिलीप मालवणकर यांस हे स्ट्रक्चरचे काम देण्यात आले. या स्ट्रक्चरच्या बांधकामास एकूण रु.१९०,०००/- (रुपये एक लाख नव्वद हजार फक्त) खर्च होणार असून हे काम सुरू झालेले आहे आणि या महिण्याच्या अखेरीस पूर्ण होण्याची शक्यता आहे.

उपस्थितांस पुढे माहीती देण्यात आली की टाकीच्या स्ट्रक्चरचे काम पूर्ण झाल्यावर पाईपलाइन टाकण्याचे काम हाती घेता येईल. पाण्याच्या टाक्यांचेही कोटेशन मागविण्यात आलेली असून उपलब्ध कोटेशन नुसार दोन डबल लेअर सिंन्टेक्स कंपनीच्या ५००० लिटरच्या टाक्यास अंदाजे रु.८२,५७६/- (रुपये ब्याऐंशी हजार पाचशे शहात्तर फक्त) खर्च अपेक्षित आहे. श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे माहीती दिली की संस्थकडे आतापर्यंत जवळपास रु.१६१,०००/- (रुपये एक लाख एकसष्ट हजार फक्त) इतका फंड जुन्या थकबाकी वसुली मार्फत आणि नवीन सभासद नोंदणी अभियांना अंर्तगत जमा झालेला असून या कामासाठी जवळपास रु.५००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) इतक्या फंडाची आवश्यकता आहे. या आवश्यक असलेल्या फंडाच्या उभारणीसाठी ग्रामस्थांस दिनांक ३१ मे २०१७ रोजी पत्र पाठवून मदतीचे आवाहन करण्यात आलेले आहे. टाकीच्या स्ट्रक्चरचे काम पूर्णत्वात येत असल्यामुळे उर्वरीत फंडाची उभारणी लवकरात लवकर होणे आवश्यक आहे त्यामुळे कार्यकारीणी सदस्यांनी तसेच ग्रामस्थांनी त्यांच्या माहीतीतील व्यक्तींशी संर्पक करून या फंड उभारणीस  हातभार लावावा.

उपस्थितांस माहीती देण्यात आली की पाण्याच्या टाकीचे स्ट्रक्चरचे बांधकाम श्री शंकर बाळकृष्ण राणे यांच्या घराशेजारील जागेत करावयाचा विचार करण्यात आला होता कारण ती जागा वस्तीच्या जवळच परंतू वाडीतील घरांच्या एका बाजूला आणि उंचवट्यावर असल्यामुळे संपूर्ण वाडीस पुरेश्या दाबाने पाणीपुरवठा होऊ शकत होता. त्यानंतर श्री शंकर बाळकृष्ण राणे यांस याबाबत विचारणा करण्यात आली होती आणि त्यांनी टाकीच्या बांधकामासाठी दाखविलेली जागा त्यांचे कूटूंबियांचीच असल्याची माहीती दिली होती. जागेची साफसफाई करण्याचे काम श्री शंकर बाळकृष्ण राणे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते.

टाकीच्या स्ट्रक्चरच्या बांधकामासाठी खोदकाम सुरू झाल्यानंतर श्री अंकूश मारूती राणे यांनी संस्थेच्या निर्दशनास आणून दिले की प्रत्यक्षात बांधकाम करण्यात येत असलेली जागा ही श्री शंकर बाळकृष्ण राणे यांच्या कुटूंबियांची नसून ती त्यांच्या (श्री अंकूश मारुती राणे यांच्या) कुटुंबियांची असल्यामुळे श्री शंकर बाळकृष्ण राणे यांनी दुसऱ्याची जागा स्वत:च्या मालकीची असल्याचे भासवून संस्थेची दिशाभुल केलेली आहे. तसेच श्री अंकुश मारुती राणे यांनी खेद व्यक्त केला की संस्था प्रत्येक वेळी त्यांस डावलून / न विचारता कामे का करत असते ?

श्री अंकूश मारुती राणे यांस समजविण्यात आले की संस्थेस पुरविण्यात आलेल्या चुकीच्या माहितीमुळे संस्थेने त्या जागेत बांधकाम सुरू केलेले आहे. तसेच श्री शंकर बाळकृष्ण राणे यांनी स्वतःची म्हणून दाखविलेली जागा दुसऱ्या कोणाची असेल अशी शंकाही त्यावेळी संस्थेस तसेचे उपस्थितांस न आल्यामुळे आपणांस किंवा आपल्या कुटुंबियांस याबाबत विचारणा करण्यात आली नाही. त्यावर श्री अंकूश मारुती राणे यांनी आश्चर्य व्यक्त करून सांगितले की श्री शंकर बाळकृष्ण राणे हे कित्येक वर्षे गावी वास्तव्यास होते आणि त्यांनी त्यांचे जागेत कवळतोड वगैर केलेली असल्यामुळे बांधकाम होत असलेली जागा त्यांची नाही याची पूर्णतह: माहिती त्यांस असावयास हवी.

श्री अंकुश मारुती राणे यांस समजविण्यात आले की करण्यात येत असलेले बांधकाम कोणा एका व्यक्तीच्या व्यक्तीगत स्वार्थासाठी नसून संपूर्ण ग्रामस्थांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे आपण या बांधकामास विरोध करू नये त्यावर श्री अंकूश मारुती राणे यांनी समजूतदारपणे त्यांच्या जागेत होत असलेल्या टाकीच्या बांधकामास घेतलेला विरोध मागे घेतला. श्री अंकुश मारुती राणे यांनी बांधकामाच्या जागेबाबत विरोध मागे घेतल्यामुळे आणि खुल्या दिलाने बांधकाम करण्यास परवानगी देत असल्यामुळे संस्थेने त्यांचे कुटूंबियांकडून टाकीच्या स्ट्रक्चरसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेसाठी बक्षिसपत्र किंवा भाडेकरारपत्र करुन घ्यावे अशी सूचना श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी केली असता सर्व उपस्थितांनी या सुचनेस अनुमोदन दिले.

उपस्थितांस जाणीव करून देण्यात आली की याप्रकारच्या जागेच्या मालकीसंबधी मागिल वेळेसही प्रश्न उपस्थित झाला होता कारण डोहाच्या चिंचेजवळ पारंपारिक विहीर बांधण्यास उपयुक्त असलेली जागा प्रथम श्री शंकर बाळकृष्ण राणे यांनी आपली असल्याचे सांगितले होते परंतू गणपतीच्या दरम्याण गावी घेण्यात आलेल्या सभेमध्ये श्री तुकाराम (बाळा) राणे यांनी ती जागा राणे कुटूंबियांची असल्याची माहिती सभेपुढे ठेवल्यावर श्री शंकर बाळकृष्ण राणे यांस त्याबाबत खुलास करता आला नव्हता. महत्वाचे म्हणजे वाडीतील बहूतांशी जागांची मालकी पारंपारिक वहीवाटीनुसार चालत आलेली आहे व फक्त स्थानीक वयस्कर ग्रामस्थास किंवा गावी काम केलेल्या व्यक्तींस याबाबत माहीती आहे. वाडीतील ग्रामस्थांनी आपल्या जागांची मोजणी गेली कित्येक दशके न केल्यामुळे जागा मालकीसंबधी अशा प्रकारचे संभ्रम निर्माण होत आहे किंवा होऊ शकतात.

वरील कारणामुळे गावी वास्तव्यास असलेल्या ग्रामस्थांनी संस्थेने सार्वजनिक कामासाठी एखादी जागा निश्चित केल्यास जागेच्या मालकीबाबत काळजीपूर्वक माहीती द्यावयास हवी जेणेकरून असे प्रसंग पुन्हा उद्भवून वाद होणार नाहीत आणि संस्था / कार्यकारीणी सदस्य अडचणीत येणार नाही. संस्था करीत असलेले प्रयत्न ग्रामस्थांच्या हितासाठीच असल्यामुळे कोणत्याही ग्रामस्थाचा संस्थेच्या कामास विरोध असणार नाही याची खात्री संस्थेस आहे परंतू योग्य जागामालकास विचारणा न करता त्याच्या जागेत बांधकाम केल्यास त्यास वाईट किंवा डावलले गेल्यासारखे वाटणे स्वाभाविक आहे. संस्था यापुढे याबाबत योग्य ती खबरदारी घेईलच परंतू स्थानिकांनी देखील यापुढे काळजीपूर्वक माहिती पुरविल्यास अशा प्रकारचे प्रसंग पुन्हा उद्भवणार नाहीत.

यानंतर उपस्थितांनी श्री अंकूश मारुती राणे यांनी जागामालकीचा विषय ताणून न धरता संस्थेस केलेल्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले आणि याविषयाची कार्यकारीणी सभेत चर्चा करण्यात आली आहे ही माहीती त्यांस मिळावी या उध्देशाने आजच्या सभेचे इतिवृत्त श्री अंकूश मारुती राणे यांसही पाठविण्यात यावे अशी सूचना केली.

**<u>विषय क्रमांक ८</u>**

सचिवांनी २०१७ – १८ या आर्थिक वर्षाकरीता तयार करण्यात आलेली हिशेबपत्रके उपस्थितांपुढे सादर केली आणि उपस्थितांस याबाबत काही सूचना / माहिती हवी आहे का ? अशी विचारणा केली. सचिवांनी पुढे सांगितले की उपस्थितांकडून हिशेबपत्रकांस मंजूरी मिळाल्यावर संस्था कार्यकारीणी सभेत मंजूर करण्यात आलेली हिशेबपत्रके शासकिय लेखापरिक्षकाकडून लेखापरिक्षित करुन घेईल व त्यानंतर लेखापरिक्षित केलेली हिशेबपत्रके वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मंजूरी करीता मांडण्यात येतील. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली हिशेबपत्रेक लेखापरिक्षकाच्या अहवालासहीत धर्मदाय आयुक्तांकडे सादर करण्यात येतील.

उपस्थितांनी सचिवांनी मांडलेल्या आर्थिक वर्ष २०१७ – १८ च्या हिशेबपुस्तकांस एकमताने मंजूरी दिली आणि पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची सूचना केली.

**<u>विषय क्रमांक ९</u>**

सचिवांनी वार्षिक अहवाल सभासदांस वितरित करण्याबाबत उपस्थितांशी चर्चा केली असता उपस्थितांकडून सूचना करण्यात आली की संस्थेने लेखापरिक्षित केलेली हिशेबपत्रके वार्षिक अहवालासोबत संस्थेच्या सभासदांस तसेच अद्याप सभासद न झालेल्या फळसेवाडीशी सलग्न ग्रामस्थांस वितरीत करावी.

वार्षिक सभेच्या तारखेसंबधी चर्चा करण्यात आली असता उपस्थित सर्वानुमते शनिवार दिनांक ११ ऑगष्ट २०१८ ही वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख ठरविण्यात आली. उपस्थितांकडून सूचना करण्यात आली की मुंबईत घेण्यात येणारी वार्षिक सर्वसाधारण सभा "**सोशल सर्विस लीग हायस्कूल**", परेल येथे घेण्यात यावी कारण तेथे तळमजल्यावर सभेसाठी जागा मिळते आणि शिरोडकर हायस्कूल येथे जागा वरील मजल्यांवर मिळत असल्यामुळे चढणे-उतरणे वयस्कर सभासदांस कष्टदायक असते.

गावी घेण्यात येणाऱ्या वार्षिक सभेसंबधी चर्चा करण्यात आली असता उपस्थितांतर्फे ठरविण्यात आले की दरवर्षीप्रमाणे गणपती उत्सवादरम्याण ग्रामस्थांच्या माहितीसाठी / प्रबोधनासाठी शुक्रवार दिनांक १४ सप्टेंबर २०१८ (ऋषीपंचमी) रोजी गावी वार्षिक सभा आयोजित करण्यात यावी आणि या सभेबाबतची सर्व पूर्णतयारी / आयोजन करण्याची जबाबदारी स्थानिक कार्यकारीणी सदस्यांवर सोपविण्यात यावी.

**<u>विषय क्रमांक १०</u>**

सचिवांनी उपस्थितांना माहीती दिली की गेल्या कार्यकारीणीच्या सभेनंतर कोणत्याही सभासदाकडून अथवा ग्रामस्थाकडून संस्थेकडे पत्रव्यवहार झालेला नाही.

**<u>विषय क्रमांक ११</u>**

उपस्थित सभासदांकडून / आमंत्रिता कडून कोणत्याही नवीन योजना मांडण्यात आल्या नाहीत.

**<u>विषय क्रमांक १२</u>**

अध्यक्षांच्या परवानगीने श्री उदय भगवान राणे (खजिनदार) यांनी उपस्थितांस सांगितले की संस्थेचे सभासद श्री आनंद नारायण साटम यांस सभासद नोंदणी अभियाना अर्तंगत संर्पक करण्यात आला असता त्यांनी त्यांचे घरातील इतर सदस्य सभासद होण्यास इच्छूक नाहीत असे कळविले असल्यामुळे अश्याप्रकारचा अनुभव आल्यास काय करावे

अशी विचारणा केली असता उपस्थितांनी विचार मांडला की गेले वर्षभर ग्रामस्थांच्या हितासाठी संस्था कळकळीने काम करण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यापैकी काही कामे मार्गी लावण्यात यशही आलेले आहे. या वर्षापासून हिशेबपत्रकेही वेळच्यावेळी सभासदांस मिळावी यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. संस्थेचा कारभार पूर्नत:हा पारदर्शी ठेवण्याचा प्रयत्न कार्यकारीणी सदस्य करीत असतांना आणि संस्थेची प्रवेशी फी नाममात्र रु.१००/- असतांना तसेच वार्षिक फी फक्त रु.६००/- असतांना आणि ती न भरण्याची सवलतही असताना एखादा ग्रामस्थ संस्थेचा सभासद का होऊ इच्छित नाही याची विचारणा कार्याकरीणी सदस्यांनी एकत्रितपणे त्या ग्रामस्थास करावयास हवी. संस्थेचे सभासदत्व स्वीकारण्यास इच्छूक नसणारा ग्रामस्थ संस्थेच्या संघटीत शक्तीस का हातभार लावत नाही याची त्यास विचारणा करून त्याचे समाधान करावयाचा प्रयत्न करावयास हवा.

श्री सुनिल सदानंद राणे यांनी विषय मांडला वाडीतील कचरा / प्लाष्टीक पिशव्या बाटल्या इत्यादी वाडीवर येण्याजाण्याच्या रस्त्यावरच टाकलेल्या असतात व त्याची काही विल्हेवाट लागत नसल्यामुळे वाडीमध्ये प्रवेश करतांनाच कचरा दिसण्यात येतो जे बरे दिसत नाही. ग्रामस्थांस समजावून वाडीच्या बाहेर एक ठिकाण ठरवून तेथे विघटण न होणारा कचरा टाकल्यास वाडीतील परीसर स्वच्छ राहील. ग्रामस्थांना शक्य असल्यास त्यांनी विघटण होणारा कचरा म्हणजे खरकटे, कापलेल्या भाज्यांचे तुकडे इत्यादीची विल्हेवाट त्यांच्या आवारातच खड्डा खोदून केल्यास बरे होईल. सर्व महाराष्ट्रात सध्या प्लाष्टीक बंदी सुरु असल्यामुळे आणि पर्यावरणाबाबत जागरुकता वाढत असल्यामुळे संस्थेने पुढाकार घेऊन याबाबात जनजागृती करावयास हवी.

उपस्थितांकडून माहीती देण्यात आली की आपल्या ग्रामस्थांच्या मुलांपैकी कुमार पार्थ भरत राणे (श्री भरत गणपत राणे), कुमारी अनुष्का अंकूश राणे (श्री अंकूश मारूती राणे) आणि कुमारी भार्गवी अशोक राणे (श्री अशोक दत्ताराम राणे) ही मुले शालांत परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेली आहेत. तसेच श्री सुनिल सदानंद राणे यांनी माहीती दिली की त्यांचा मुलगा कुमार मयुरेश सुनिल राणे यांनेही त्याचे उच्चशिक्षण (एम बी ए) पूर्ण केलेले आहे.

अध्यक्षांनी सर्व यशस्वी मुलांच्या अभिनंदनाचा ठराव उपस्थितांपुढे मांडला असता सर्वानुमते तो संमत करण्यात आला. तसेच उपस्थितांतर्फे सूचना करण्यात आली की वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीशीमध्ये ग्रामस्थांना त्यांच्या कुटूंबातील दहावी, बारावी, पदवीपरीक्षा तसेच उच्चशिक्षित मुलांची / सदस्यांची माहीती कार्यकारीणी सदस्यांतर्फे संस्थेस देण्याची सूचना करण्यात यावी. या यशस्वी मुलांचे अभिनंदन व सत्कार संस्थेच्या वतीने मुंबईतील वार्षिक सर्वसाधारण सभेत किंवा गावातील वार्षिक सभेत करण्यात यावा.

त्यानंतर सचिवांनी उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

---

| | |
|---|---|
| श्री सुनिल सदानंद राणे<br>सचिव | श्री मंगेश मनोहर राणे<br>अध्यक्ष |